**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्याचं कर्ज आणि महसुली तूट सुरक्षित मर्यादेच्या आत असल्याचं अर्थमंत्री अजित पवार यांचं विधानसभेत स्पष्टीकरण, गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना बंद करण्याचं सूतोवाच.

- खासगी आस्थापनांमधे विशाखा समिती स्थापन करणं बंधनकारक करण्याची महिला आणि बालविकास मंत्र्यांची विधानपरिषदेत घोषणा

- विद्यार्थ्यांना दिली जाणारी वार्षिक शिष्यवृत्ती त्यांच्या नियमित खर्चाची पूर्तता करण्यासाठी पुरेशी नसल्याचं संसदीय स्थायी समितीकडून स्पष्ट

- विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीत पाच जागांसाठी ६ अर्ज दाखल

**आणि**

- येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

राज्याचं सध्याचं कर्ज सुरक्षित मर्यादेच्या आत आहे, असं उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सांगितलं. ते विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. गेल्या १५ वर्षात राज्याच्या कर्जाचं स्थूल उत्पादनाशी प्रमाण १६ ते १९ टक्के आहे. २५ टक्क्यापर्यंत आपण कर्ज घेऊ शकतो. महाराष्ट्रासह देशातल्या केवळ ३ राज्यांचं कर्जाचं प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्यामुळे सध्याच्या आर्थिक स्थितीबाबत निराधार आरोप करून राज्याची आर्थिक परिस्थिती खालावल्याचं खोटं चित्र रंगवू नका, असं आवाहन त्यांनी केलं.

तुटीचा अर्थसंकल्प असल्याबद्दल विरोधकांनी केलेल्या टीकेलाही त्यांनी उत्तर दिलं. महसुली तूट आणि राजकोषीय तूटही मर्यादेत असल्याचं ते म्हणाले…

**होल्ड- बाईट - अजित पवार..(२८ सेकंद)**

विकसित भारताच्या निर्माणासाठी विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप ठरवणारा हा अर्थसंकल्प असून महाराष्ट्राचा संतुलित विकास करण्याची क्षमता अर्थसंकल्पात असल्याचा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला. आगामी ५ वर्षांचा विचार करून यंदाचा अर्थ संकल्प सादर केला आहे. शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सर्व घटकांचा विकास डोळ्यासमोर ठेवला आहे, असं ते म्हणाले. राज्याच्या आणि विविध समाज घटकांच्या हिताच्या योजना बंद करणार नाही. पण गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना सरकार बंद करेल. त्यासाठी निधी दिलेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. लाडकी बहीण योजना सुरू ठेवताना त्यात दुरुस्ती करण्याची सरकारची भूमिका आहे. दुरुस्ती करताना गरीब महिलांना फायदे मिळत राहतील असं त्यांनी नमूद केलं.

राज्याच्या विविध भागांच्या अनुशेषामध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक घट झाल्याची माहिती त्यांनी दिली. क्रांतिसिंह नाना पाटील यांचं स्मारक सांगली जिल्ह्यात उभारलं जाईल. नवी दिल्लीत मराठी भाषक नागरिकांसाठी सांस्कृतिक भवन उभारलं जाईल, बीडमध्ये विमानतळ उभारण्यासंदर्भातली कार्यवाही वेगानं केली जाईल, अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. राज्यातल्या जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि राज्याच्या विकासाच्या शिखरावर नेण्याचा संकल्प पूर्ण करू, असं आश्वासन त्यांनी आज दिलं.

**<><><><><>**

महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित वाटावं आणि अत्याचाराविरुद्ध दाद मागता यावी यासाठी राज्य सरकार सर्व खाजगी आस्थापनांमध्ये विशाखा तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक करणार असल्याचं महिला आणि

बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं . सर्व शासकीय कार्यालयात या विशाखा समित्या स्थापन झाल्या असून खाजगी आस्थापनांमध्ये त्या स्थापन व्हाव्यात यासाठी महिला आणि बालविकास आयुक्तालयाला राज्य समन्वय अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. महिलांना SHE BOX ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून देखील तक्रार नोंदविता येईल असे तटकरे यांनी सांगितलं .

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या केज इथले शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी संस्थाचालकाच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली, त्यामुळे संबंधित संस्थाचालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेत केली. तसंच विना अनुदानित शाळांमधल्या शिक्षकांना वेतन देणं संस्थाचालकांना बंधनकारक करावं अशी सूचना केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई केली जाईल, असं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची तुलना औरंगजेबाशी केल्याबद्दल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी भाजपा नेते प्रवीण दरेकर यांनी यांनी केली. यावर योग्य ती कारवाई केली जाईल असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय कापूस महामंडळामार्फत सुरू असलेली कापूस खरेदी पारदर्शकपणे व्हावी यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असून आत्तापर्यंत राज्यात १२४ केंद्रांमार्फत १४२ कोटी ६९ लाख क्विंटल इतकी कापूस खरेदी करण्यात आली आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत दिली. १५ मार्चपर्यंत नोंदणी झालेल्या सगळ्यांची कापूस खरेदी करण्यात येईल आणि ही मुदत

वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्यात येतील, असं आश्वासन रावल यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ६० फूट उंचीच्या पुतळ्याचं काम राज्य सरकार पूर्ण करत असून लवकरच त्याचं लोकार्पण केलं जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सांगितलं. आमदार निलेश राणे यांनी स्मारकासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देताना पवार यांनी ही माहिती दिली.

**<><><><><>**

रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांच्या हस्ते झालं. गेल्या २०० वर्षांपासून भारत आणि न्यूझीलंड यांच्यात संबंध आहेत आणि आजही विविध क्षेत्रात सहकार्य वृद्धीसाठी दोन्ही देश कार्यरत असल्याचं लक्झन यावेळी म्हणाले. दोन्ही देशांमध्ये अतिशय सक्षम मनुष्यबळ आहे आणि परस्पर समृद्धीसाठी कार्यरत राहू असं ते म्हणाले. जगभरात अर्थकारणापेक्षा सुरक्षेला अधिक प्राधान्य दिलं जातं आहे. त्याचवेळी सार्वभौमिकता जपण्याला आम्ही प्राधान्य देऊ, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांना सध्या दिली जाणारी वार्षिक शिष्यवृत्ती वाढत्या महागाईमुळे त्यांच्या नियमित खर्चाची पूर्तता करण्यासाठी पुरेशी नाही, असं संसदीय स्थायी समितीनं नमूद केलं आहे. त्याबाबतचा अहवाल आज संसदेत मांडण्यात आला. पार्श्वभूमीवर, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभाग, शिक्षण मंत्रालय आणि इतर संबंधितांसह विविध अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला दिल्या जाणाऱ्या वार्षिक शिष्यवृत्ती रकमेचा आढावा घेण्याच्या सूचनाही या समितीनं दिल्या आहेत.

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जवळपास १४ हजार १६५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद असूनही, फेब्रुवारी २०२५ पर्यंत शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनांवर केवळ ३ हजार ४०३ पूर्णांक ५१ कोटी रुपये खर्च केले असल्याबद्दल समितीनं विभागावर ताशेरे ओढले आहेत. वेळोवेळी त्याचं पुनरावलोकन करण्याची शिफारसही या अहवालात केली आहे.

<><><><><>

राज्य विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी पाच जागांकरता सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज दाखल करायच्या आजच्या शेवटच्या दिवशी भाजपाकडून संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी यांनी आज आपले अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी यांनीही अर्ज भरला. तर अपक्ष उमेदवार उमेश म्हेत्रे यांनीही अर्ज दाखल केला आहे. ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे. मतमोजणी त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता होईल.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर नऊ महिन्यांहून अधिक काळ अडकलेल्या सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर उद्या रात्री पृथ्वीवर परतणार आहेत. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने ही माहिती दिली आहे. त्यांना स्पेसएक्स क्रू ड्रॅगन यानातून परत आणलं जाणार आहे. त्यांच्यासह नासाचे अंतराळवीर निक हेग आणि रशियन अंतराळवीर ॲलेक्झांडर गोर्बुनोव्ह हे देखील ड्रॅगन कॅप्सुलवर परतणार आहेत.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांचा विकास करुन, त्यांच्या कार्याची प्रेरणा आपण घेत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

पंढरपुरातले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, वि. मा. मिरासदार यांचं आज निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

तालुका संघचालक, जिल्हा संघचालक आणि पुणे विभाग संघचालक या पदांवर ते होते. भारत विकास परिषद आणि अन्य सामाजिक संस्थांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

<><><><><>

विदर्भात काही ठिकाणी काल उष्णतेची लाट होती. विदर्भात बहुतांश ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट राहील, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

<><><><><>

मुंबईत होत असलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ईस्पोर्ट्स स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ईस्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या ऑनलाईन स्पर्धेत ई-फुटबॉल, WCC आणि BGMI या खेळांचे सामने राष्ट्रीय स्तरावर विविध टप्प्यात होणार आहेत.

//<><><><><>//